**वाचा : शिक्षण, महिला व बालकल्याण समितीने समंत केलेला ठराव क्रं. ११ दि १०/१२/२०१०.**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**
**शिक्षण, महिला व बालकल्याण समिती**
**``जाहिर प्रगटन``**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व स्थानिक कलाकारांना पथनाटय सादर करण्याविषयी जाहिर अवाहन करण्यात येत आहे. सध्या समाजात विवाह समारंभांमध्ये हुंडयाची अनिष्ठ प्रथा वाढत असुन कायदयानुसार हुंडा घेण्यास व देण्यास प्रतिबंध असतानाही हुंडा पध्दती चालुच आहे. व हुंडा बळीची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे तसेच PNDT Act चे पालन करणे व मुलींच्या हत्या टाळण्यासारखे अनिष्ठ प्रथेविरुध्द समाजात जन जागृती व्हावी या दृष्टीकोणातुन सर्व स्थानीक कलाकांराच्या संचाना नाटके, कलापथके ई. आयोजीत करण्यासाठी ईच्छुक असणारे आपल्याकडे असलेल्या कलेचा अविष्कार, (प्रात्येक्षिक दाखवल्यानंतर) मनपा हद्दीतील झोन क्रं. ०१ ते ०५ निहाय पथनाटय, कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

तरी स्थानीक कलाकारांच्या संचानी बंद पॉकेट मध्ये त्यांच्या कडे असलेले कलाकांराची संख्या, कार्यक्रमासाठी लागणारा वेळ, साहित्य, व एका कार्यक्रमासाठी घ्यावयाचे मानधन पथनाटयाची मध्यवर्ती विचार व संकल्पना सह प्रात्येक्षीक सादर करणेसाठी अर्ज दिनांक --४/२/११-- या रोजी प्रत्येक्षात सादर करावीत. या पथनाटयामध्य राजकीय टिका टिपणी नसावी अर्ज केल्यानंतर त्या त्या कलाकांरांना ाी वेगवेगळया विषयावर सादरीकरण/ प्रात्यक्षीक दाखवण्यासाठी मनपाचे शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात सामुहीक तारीख कळविण्यात येईल. व त्यांचे व्हिडीओ चित्रिकरण करुन त्यापैकी एक किंवा अनेकांना पुढिल संधी देण्यासाठी करार कण्यात येइल.

तरी ईच्छुकांनी आपल्या दोन्ही संकल्पना / थीमसह, कलाकार संख्या व अपेक्षीत मानधनासह दिनांक --१५/२/११---------- रोजी पर्यंत नोडल ऑफिसर, शिक्षण, महिला व बालकल्याण समिती यांचे कडे अर्ज सादर करावे. व तदनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

सही/-
**आयुक्त**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

---

जा.क्रं./नांवाशमनपा/शि,मव बाकस/नो ऑ/ 9036 /११.
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड.
दिनांक. 28/ 1 /२०११.

प्रति,
**मा. संपादक.**
दै.-- सत्यप्रभा --, नांदेड.

29/1/11

उपरोक्त जाहिर प्रगटन आपल्या दैनिकामध्ये कमीत कमी जागेमध्ये प्रसिध्दीस द्यावे. व दोन प्रतीमध्ये बिल सादर करावे. ही विनंती.

**प्रतिलिपी माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव.**

०१. मुख्य लेखा परिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
०२. मुख्य लेखा अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
०३. अंतर्गत लेखा परिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
०४. नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
०५. संगणक कक्ष, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

188